माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१०६९२/२१/अ.क्र.४७९३/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०६९३/२१/अ.क्र.४७९४/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०६९४/२१/अ.क्र.४७९५/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०६९५/२१/अ.क्र.४७९६/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०६९७/२१/अ.क्र.४७९७/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०६९८/२१/अ.क्र.४७९८/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.१०६९६/२१/अ.क्र.४७९९/२५/०१**

**श्री. विकी कुमार**
गणेश नगर, राजमाता रोड,
अंधेरी (ईस्ट), मुंबई-४०००९३

**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत व कारखाने) के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (ऑनलाईन) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१२.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) के/पूर्व विभाग दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी (इमारत व कारखाने) के/पूर्व विभाग अनुपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. विकी कुमार यांनी अपील क्रमांक ४७९३ ते ४७९९ या सर्वच प्रकरणास त्यांनी दाखल केलेल्या

तक्रारीवर ज्यात अनधिकृत बांधकाम केले असल्याबाबत आक्षेप नोंदविला आहे. त्यावर महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला असून, यातील तीन प्रकरणात अशा प्रकारच्या अनधिकृत किंवा अवैध बांधकामाबाबत प्राप्त तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील महानगरपालिकेच्या RETMS www.removalofenencroachment.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांनी ते प्राप्त करून घ्यावे, असे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. एका प्रकरणात तक्रारीवर कारवाई केली नसल्याचा प्रतिसाद देऊन कार्यवाही केली नसल्याने दस्ताऐवज स्वरूपात कुठलीही माहिती उपलब्ध नसल्याचे नमूद केले, तर यातील एका प्रकरणात नोटीस जारी केल्यानंतर अनधिकृत बांधकामावर कारवाई का करण्यात आलेली नाही. या संदर्भातील सर्व कागदपत्रांची माहिती देण्याबाबत सुचित केलेले आहे. यातील प्रत्येक प्रकरणात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी (इमारत व कारखाने) के/पूर्व विभाग यांनी तपशीलवार आदेश पारित केले असून, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) के/पूर्व विभाग यांनी दिलेल्या उत्तरांशी सहमती दर्शवत यातील काही प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) के/पूर्व विभाग यांनी दिलेल्या उत्तराची प्रत पुन्हा देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच जर कागदोपत्री माहिती उपलब्ध असल्यास ती देखील देण्याचे निर्देश काही प्रकरणात देण्यात आलेले असून, ज्या ठिकाणी कारवाई करण्यात आलेली नाही तेथील कागदोपत्री स्वरूपात माहिती नसल्याची वस्तुस्थितीची अपिलार्थी यांना जाणीव करून देण्यात आली असून, अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जात अवैध बांधकामाबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्याचा तसेच कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर वाचवण्याचा व त्यांची पाठ राखण करण्याचा उद्देश असल्याचेही यात नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) प्रमाणे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती प्रदान करणे इतके असून उपरोक्त प्रकरणास अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी स्तरावरच प्रत्येक प्रकरणात माहिती देण्यात आली असल्याचे या आधीच नमूद केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती आहे, त्या स्वरूपात देणे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(१)(त्र) प्रमाणे माहितीचा अधिकार याचा अर्थ कोणत्याही सर्व सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व त्या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा असून यात माहिती तयार करून देणे, कार्यवाहीची अपेक्षा करणे, प्रत्यक्षात कार्यवाहीची मागणी करणे अथवा एखाद्या विशिष्ट पद्धतीने प्राधिकरणाने कारवाई करणे इत्यादी बाबींचा समावेश होत नसून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील

कलम २(च) नुसार माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील दस्ताऐवज अभिलेख, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, अहवाल नमुने, कागदपत्रे, कोणतीही ईलेक्ट्रॉनीक स्वरुपातील आधार सामग्री इत्यादीचा समावेश होतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार एखाद्या विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाही मागील खुलाशा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येत नमूद असलेली माहिती ही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) के/पूर्व विभाग यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत पुरवली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता दाखल केलेले सर्व द्वितीय अपील अर्ज तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहेत.

**आदेश**

**वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १२.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission ★ Maharashtra ★